# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**१ ला मजला, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.**

**Email ID-**

**क्रमांक :- सफाई २०२३/प्र क्र.४७/सआक,** **दिनांक :- ७ ऑगस्ट, २०२३.**

**प्रति,**

**१) सर्व आयुक्त, महानगरपालिका,**
**२) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.**

**विषय :- लाड समितीच्या शिफारशीनुसार निर्गमित झालेल्या दिनांक २४/२/२०२३ च्या सुधारीत शासन निर्णयातील मुद्दयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन.**

**संदर्भ :- श्री.प्रकाश हरीचंद्र चमके यांचे दि.१८/७/२०२३ चे निवेदन.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय निवेदनाची प्रत या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

२. लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने दिनांक २४/२/२०२३ रोजी सर्वसमावेशक सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यातील काही मुद्यांवर मार्गदर्शन देण्याची विनंती नागपूर महानगरपालिकेने दिनांक १४/३/२०२३ च्या पत्रान्वये या विभागास केली होती.

त्यास अनुसरुन या विभागाने दिनांक ३/५/२०२३ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस अभिप्राय देतांना त्यात "सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १०/४/२०२३ रोजी दिलेल्या न्यायालयीन निर्णयानुसार दिनांक २४/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयास स्थगिती दिलेली आहे याची कृपया नोंद घेण्यात यावी" असे नमूद केले होते.

तथापि, शासनाच्या उपरोक्त दिनांक ३/५/२०२३ च्या पत्रामुळे भंगी, मेहतर व वाल्मिकी समाज अशिक्षित असल्याने सफाई कामगारांच्या वारसांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे संदर्भिय निवेदनात नमूद केले आहे.

३. उपरोक्त बाबीस अनुसरुन नमूद करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र.३९५०/२०२३ श्री.कैलाश राजकोर व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन प्रकरणी दिलेल्या दिनांक १०/४/२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत –

"In view of the above and considering the law laid down by the Hon'ble Supreme Court in Ahmednagar Mahanagar Palika V Ahmednagar Palika Kamgar Union(2022) 10 SSC 172] we direct that the State Government would refrain from extending the benefits of the Government Resolution dated 24th February, 2023 until further orders, save and except to the legal heirs of the those employment, who belong to Walmiki, Mehtar and Bhangi communities."

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशान्वये वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यापासून सूट देण्यात आली असून या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे.

सबब, सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देतांना मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करावी.

**सहपत्र- वरीलप्रमाणे.**

आपला,

**( अजय क. पवार )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी –
श्री.प्रकाश हरीचंद्र चमके, गंगाबाई घाट, नागपूर ४४०००८.

Scanned with OKEN Scanner